जनता शिक्षण संस्थेचे,

# किसन वीर महाविद्यालय, वाई

## राज्यशास्त्र विभाग

### बी.ए. भाग ३

प्रकल्प अहवाल

## प्रकल्पाचे नाव :- भारत - चीन संबंध

सादरकर्ते

| अ. न. | हजेरी क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | सही |
|---|---|---|---|
| 1 | 69 | सपकाळ अपर्णा अमित | A.A.Sapkal |
| 2 | 88 | दुधाने सायली ज्ञानदेव | Sayali |
| 3 | 100 | खरे धनश्री संतोष | DSKhare |
| 4 | 102 | शिंगटे नितीन राजेश | NRShingate |
| 5 | 110 | जाधव ऋतुजा रमेश | Rutuja |

मार्गदर्शक – प्रा. राजेंद्र जायकर
प्रा. सुरज यादव
प्रा. उमा जाधव

**सन २०२३-२४**

# ऋणनिर्देशन

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. भाग ३ वर्गासाठी राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे आम्ही भारत – चीन संबंध हा विषय निवडला आहे. प्रथमतः आम्ही मा. कुलगुरू शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे आभारी आहोत. त्यांनी राज्यशास्त्र विषय आमच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करून आम्हाला अभ्यासाची संधी दिली.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. जे. फगरे यांच्या अमूल्य सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आम्हाला मार्गदर्शन करणारे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. राजेंद्र जायकर सर तसेच राज्यशास्त्र विभागातील प्रा. सुरज यादव सर व प्रा. उमा जाधव यांचे देखील आम्ही मनापासून आभार मानतो.

धन्यवाद !!

| अ. न. | हजेरी क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | सही |
|---|---|---|---|
| 1 | 69 | सपकाळ अपर्णा अमित | A. A Sapkal |
| 2 | 88 | दुधाने सायली ज्ञानदेव | Sayali |
| 3 | 100 | खरे धनश्री संतोष | DSKhare |
| 4 | 102 | शिंगटे नितीन राजेश | NRShingate |
| 5 | 110 | जाधव ऋतुजा रमेश | Rutuja |

दिनांक: २१-०२-२०२४

ठिकाण: वाई

# अनुक्रमणिका



| अ.नं | विषयाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | 1 |
| २ | विदयार्थ्यांची घोषणा | 2 |
| ३ | ऋणनिर्देशन | 3 |
| ४ | भारत चीन संघर्ष | 4 |
| ५ | संयुक्त राष्ट्र | 5 |
| ६ | इ.स. १९५२ - ५३ चा काळ | 6 |
| ७ | तिबेटवर चिनी सत्ता | 7 |
| ८ | भारताने उत्तरसीमा व सीमाप्रदेश | 8 |
| ९ | चीनची दडपशाही | 9 |
| १० | भारता चीन सीमा | 10 |
| ११ | गार्टोक सैन्य व विनमातळ | 11 |
| १२ | चीनी सैनीकांची घुसखोरी | 12 |
| १३ | तवांग व जंग त्रिभुजा | 13 |
| १४ | चीनच्या वरील तीन कलमी सुचना | 14 |
| १५ | भारत - चीन सीमाप्रद्रश : युध्दोत्तर परिस्थीती, पूर्व विभाग | 15 |
| १६ | वालॉगच्या लढाई | 16 |
| १७ | संदर्भ ग्रथ | 17 |
| १८ | प्रश्नावली | 18 |
| १९ | सारांश | 19 |

# प्रस्तावना

भारत आणि चीन यांच्या राजकीय संबंधाला नुकतीच ६० वर्षे पूर्ण झाली. या घटनेच्या निमित्ताने दोन्ही देशांच्या राजकीय नेत्यांनी खूपच सामंजस्याची भाषा केली आहे, ही आशादायक गोष्ट आहे. चीनचे अध्यक्ष हू जिंताओ यांनी भारताच्या राष्ट्रपतींना पाठविलेल्या संदेशात १९६२ला मागे टाकून संबंधांना पुढे नेण्याची इच्छा व्यक्त केली आहे तर भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार शिवशंकर मेनन यांनी संपूर्ण जग बदलत असताना चीन आणि भारत यांनी एकमेकांकडे दूषित नजरेने पाहणे परवडणारे नाही असे म्हटले आहे. थोडक्यात, दोन्ही देशांतील आर्थिक, व्यापारी, पर्यावरण आणि जागतिक व्यवस्थेबाबतचे सहकार्य एक वेगळी पातळी गाठत असताना गेल्या शतकातील मतभेदांना उगाळत संबंधात बाधा आणणे म्हणजे घड्याळाचे काटे मागे नेण्यासारखे आहे, हे दोन्ही देशांना कळले आहे. आता जे कळले आहे ते वळणे अतिशय आवश्यक आहे. दोन्ही देशांतला मुख्य वाद आहे तो सीमेसंबंधीचा. हा वाद सोडविण्यासाठी एक निश्चित सूत्र काढून देवाणघेवाण करणे आवश्यक आहे. १९६२च्या युद्धानंतर सीमा निश्चित झालेली नसतानाही परस्परसंबंध विकसित करणे दोन्ही देशांना शक्य झाले आहे. सीमेबाबत दोन्ही देश दावे-प्रतिदावे करीत असले तरी त्यासाठी युद्ध तर सोडाच; पण शाब्दिक चकमकी करण्याचेही त्यांनी टाळले आहे. याचा अर्थ हा की, हे देश सीमावादाचा वापर राजकीय डावपेचांसाठी करीत आहेत.

दोन्ही देशांत अद्याप परस्परविश्वासाचे वातावरण निर्माण झाले नसल्याचा हा परिणाम आहे. राजकीय संबंधाच्या साठीच्या निमित्ताने आता एकमेकांसंबंधीचा हा अविश्वास कसा दूर करता येईल, याचा आधी विचार करणे आवश्यक आहे. हा अविश्वास दूर झाला की सीमाप्रश्न सुटायला फार वेळ लागेल असे वाटत नाही. भारताने तिबेट हा चीनचा स्वायत्त भाग आहे हे मान्य केले असले तरी चीनला त्याबद्दल विश्वास वाटत नाही, ही वस्तुस्थिती आहे. तसेच चीन पाकिस्तानला जी लष्करी मदत देतो त्याबद्दल भारताच्या मनात शंका आहे, हेही नाकारता येत नाही.

# भारत – चीन संघर्ष


१ ऑक्टोबर १९४९ पासून चीनमध्ये (तैवान सोडून) कम्युनिस्ट राजवट सुरू झाली. १९५१ अखेर तिबेट राष्ट्र हे चीनचाच एक भाग आहे, या सबबीवरून त्याची तथाकथित साम्राज्यवादी व वसाहतवादी अंमलातून चीनने दंडेलीने मुक्तता केली. अशाप्रकारे चीनची सीमा भारताच्या सीमेला भिडली. भारत व चीन यांच्यातील संघर्षाची अनेक कारणे संभवत असली, तरी सीमाप्रश्न हे त्यांपैकी एक प्रमुख कारण आहे. चीनला मान्य असलेली सीमा व सीमाप्रदेश, भारत स्वीकारीत नाही, हे पाहून चीनने भारताच्या सीमाप्रदेशावर अकस्मात आक्रमण केले. चीनने सुरू केलेले हे अघोषित युद्ध २० ऑक्टोबर पासून २१ नोव्हेंबर १९६२ पर्यंत चालले. या युद्धात भारतीय सैन्याचा टिकाव लागला नाही. २२ नोव्हेंबरच्या सकाळपासून चीनने एकतर्फी गोळीबार स्थगित केला व युद्ध बंद पडले तथापि या आकस्मित सैनिकी कारवाईनंतरही चीनला स्वतःच्या अपेक्षेप्रमाणे सीमाप्रश्न सोडविण्यात यश मिळाले नाही.

भारत -चीन संघर्ष

सीमाप्रश्न व भारत -चीन संघर्ष यांच्या दृष्टीने सीमाप्रदेशाचे पुढीलप्रमाणे तीन विभाग केले जातात : (१) पश्चिम विभाग – काश्मीरचा लडाख प्रांत व पश्चिम तिबेट तसेच काश्मीर – सिंक्यांग सीमा. ही सीमारेषा १,६०० किमी. आहे. यातच अक्साई चीन हा लडाखाचा पूर्वेकडील प्रदेश मोडतो. (२) मध्य विभाग : या सीमेची लांबी सु. ६५० किमी. आहे. पंजाब, हिमालय व उत्तर प्रदेश तसेच तिबेट यांच्यातील सीमा व सीमाप्रदेश यात अंतर्भूत होतात. वादग्रस्त प्रदेश – उदा., स्पिती, शिपका घाट, निलँग,जडंग , निती खिंड, लापथल व बाराहोती – यात मोडतात. (३) पूर्व विभाग : चुंबी खोरे ते दिपू खिंड. यात संपूर्ण ईशान्य भारतीय (नेफा / अरूणालच प्रदेश इ.) प्रदेशाचा समावेश होतो.भारत – चीन संघर्ष काळात महत्त्वाच्या लढाया अक्साई चीन आणि अरूणाचलाच्या कामेंग व लेहित या जिल्हयांत झाल्या.स्वातंत्र्योत्तर काळात भारताला जी संरक्षणात्मक युद्धे लढावी लागली, त्यांच्या तुलनेत हे युद्ध क्षुद्रच म्हणावे लागते.

# संयुक्त राष्ट्र

संयुक्त राष्ट्रांच्या साधारण समितीत २४ नोव्हेंबर १९५० रोजी एल् साल्वादोरच्या प्रतिनिधीने तिबेट हा कसा स्वतंत्र देश आहे व चीनचे आक्रमण हे तिबेटच्या खनिज संपत्तीच्या अपहाराकरिता आहे, हे पुराव्यानिशी दाखवून दिले. भारत व ब्रिटन (प्रतिनिधी नवानगरचे जामसाहेब) यांनी तिबेटचा प्रश्न चीन व तिबेटने शांततेने मिटवावा व साधारण समितीने प्रश्न पुढे ढकलावा, असे सुचविले. ही सूचना समितीने मान्य केली तथापि चीनने तिबेटच्या पूर्वेकडून आणि सिंक्यांग-अक्साई चीनमार्गे ल्हासावर हल्ला केला. दलाई लामांनी याटुंगमध्ये आश्रय घेतला. नोव्हेंबर १९५१ मध्ये ल्हासामध्ये चिनी सैन्य घुसले आणि तिबेट चीनने गिळला. भू-सैनिकींदृष्ट्या चीन व सिंक्यांग यांना जोडणारा तिबेट हा महत्त्वाचा दुवा आहे. तिबेटमधून सिंक्यांगमध्ये शिरण्यासाठी भारताच्या ताब्यातील लडाखमधील अक्साई चीन हस्तगत करणे, हे चीनचे राजकीय व लष्करी उद्दिष्ट होते. पश्चिम तिबेटमध्ये सोन्याचे व युरेनियमचे साठे आहेत. तिबेटच्या उत्तर सीमेवरील वाळवंटी प्रदेशांत चीनने आण्विक उत्पादन कारखाने व शस्त्रास्त्रांचे तळ उभारले आहेत.




## इ. स. १९५२ – ५३ या काळ

इ. स. १९५२ – ५३ या काळात अलिप्ततावादाच्या संदर्भात चीनबरोबर शांततामय सहजीवन या त्त्वानुसार वागण्याकडे व प्राचीन काळापासून भारताचे चीनशी असलेले मित्रत्त्वाचे संबंध चालू करण्याकडे पं. नेहरूचा कल होता. एप्रिल १९५४ मध्ये तिबेट – भारत व्यापार व इतर संबंध या बाबतीत भारत चीन करार झाला. या करारातच ⇨पंचशील – २ तत्वांचा अंतर्भाव होता. या करारामुळे तिबेट चीनचा एक भाग आहे, यांवर शिक्कामोर्तब झाले. या करारात भारतातून तिबेटमध्ये शिरण्याच्या घाटखिंडीवर चीन हक्क सांगत असल्याचे भारताला दिसून आले. भारताने आक्षेप घेतल्यावर, औदार्याचा आव आणून चीनने आपले म्हणणे मागे घेतले. आश्चर्याची बाब म्हणजे या खेपेसही भारताने सीमा निश्चित करण्याचा प्रश्न उभा केला नाही. हा करार आठ वर्षाच्या मुदतीचा होता. करार झाल्यापासून आठ वर्षानी चीनने नेफा व लडाखवर आक्रमण केले, ही घटना मोठी चिंतनीय आहे. तिबेटमध्ये चिनी सत्ता आल्याबरोबर १९५१ ते १९५४ या चार वर्षात सिंक्यांगमधील कॅश्गार ते ल्हासा हा प्रचंड रस्ता तयार करण्यात आला. पश्चिम व उत्तर चीनमधील प्रमुख स्थळांशी ल्हासाला रस्त्याने जोडण्यात आले. कॅश्गार, रूडोक, गार्टोक, ग्यांगत्से, ल्हासा येथे लष्करी तळ उभारण्यास आरंभ झाला. कॅश्गार व ल्हासा येथे लष्करी कार्यालये स्थापण्यात आली. १९५४ मध्ये प्रथमच चीनने एक नकाशा प्रसिद्ध केला. या नकाशात १८४० ते १९१९ या काळात साम्राज्यवादी सत्तांनी चीनला नागवून घेतलेले चिनी प्रांत दाखविण्यात आले. त्यांत आग्नेय पामीर, नेफा व आसाम, लडाख, नेपाळ, भूतान, सिक्कीम, अंदमान बेटे इ. प्रदेश चीनचे म्हणून दाखविण्यात आले होते. चीनच्या विस्तारावादाच्या धोक्याची खूण त्यातून दिसून आली. तिबेटमध्ये व सिंक्यांगमध्ये हानवंशीय चिनी लोकांची मोठ्या प्रमाणावर आयात सुरू झाली.

# तिबेटवर चिनी सत्ता

तिबेटवर चिनी सत्ता असल्याने १९५४ सालच्या कराराच्या संदर्भात ब्रिटिश अमदानीतील ल्हासा, गार्टोक, ग्यांगत्से, कॅश्गार (सिंक्यांग) येथील भारतीय व्यापार-कचेऱ्या, दूरध्वनी व दूरतारायंत्र केंद्रे आणि रक्षकतुकड्या चालू ठेवणे अप्रशस्त आहे, म्हणून त्या बंद करण्याची आज्ञा पं. जवाहरलाल नेहरूंनी दिली. त्यामुळे पश्चिम तिबेट आणि सिंक्यांगमधील घडामोडीची माहिती भारताला मिळण्याचे बंद झाले. तीच गोष्ट कैलास व मानससरोवराबाबतही झाली. परिणामतः चीनने तिबेट व सिंक्यांगमध्ये केलेल्या लष्करी तयारीची थोडी-बहुत माहिती भारताला मिळणे बंद झाले.




# भारताने उत्तरसीमा व सीमाप्रदेश

भारताने उत्तरसीमा व सीमाप्रदेश यांच्या संरक्षणासाठी पुढीलप्रमाणे कार्यक्रम हाती घेतला. २० नोव्हेंबर १९५० रोजी कोणालाही मॅकमहोन रेषा ओलांडू देणार नाही, अशी पं. नेहरूंनी घोषणा केली. मॅकमहोन रेषेपाशी चिनी लष्कर असल्याचे समजल्यावर तेथे १०० छत्रीधारी सैनिक उतरविण्यात आले. आसाम रायफल दलाची पुनर्रचना करण्यात आली (१९५३). १९५४ मध्ये सीमेवरील गुप्तवार्तासंकलन संघटना वाढविण्यात आली. १९५२ अखेरपर्यंत नेफातील चौक्यांची वाढ – ३ पासून २५ – करण्यात आली. १९५४ अखेर लहान – मोठ्या १०० चौक्या सीमेवर आखण्यात आल्या. नेफा समितीच्या सल्ल्याप्रमाणे हवाई तळ, पायवाटा, लहानमोठे रस्ते व दळणवळणाची साधने बांधण्याचे काम हाती घेण्यात आले. अलाँग व झेरो येथे हवाई तळ तयार झाले. नागा बंडाळी मोडण्यासाठी (चीनची मदत नागा बंडखोरांना मिळत असे व मिळत आहे.) लष्करी व इतर नागरी कार्यक्रम हाती घेण्यात आले. तिबेटच्या सीमेवरील पंजाब, हिमाचल व उत्तर प्रदेशाच्या भागात चौक्या वाढविण्यात आल्या. सीमा पोलीसदलात वाढ करण्यास सुरूवात झाली. दळणवळणाची साधने, पूल, रस्ते इत्यादींची बांधणी हाती घेण्यात आली तथापि २० ऑक्टोबर १९६२ पर्यंत लष्करी दळणवळणाच्या दृष्टीने केलेल्या सुविधा अर्धवट अवस्थेतच होत्या.

# चीनची दडपशाही

चीनच्या दडपशाहीमुळे तिबेटी जनतेने १९५९ मध्ये बंड पुकारले दलाई लामांना परागंदा होऊन भारतात आश्रय घ्यावा लागला. हजारो तिबेटी लोक ठार मारण्यात आले. अनेकांना परागंदा व्हावे लागले. दलाई लामांना आश्रय देण्यापलीकडे भारताने काही हालचाल केली नाही. एकीकडे हिंदी-चिनी भाई भाईच्या घोषणा होत असताना भारत-चीन राजकीय पत्रव्यवहारात ताणाताणी वाढू लागली. जुलै १९५८ मध्ये कालिपाँग (पश्चिम बंगाल) चीनच्या विरूद्ध चालणाऱ्या कारवाईचा तळ असून त्याचा उपयोग प्रतिगामी तिबेटी, अमेरिका व चँग-कै-शेकचा कंपू करीत असल्याचे आरोपपत्र चीनने भारताकडे पाठविले. भारताचे प्रत्युत्तर गुळमुळीत होते. ऑक्टोबर १९५८ पर्यंतच्या भारत चीन पत्रव्यवहारात बाराहोती, खुर्नाक (लडाख), पंगाँग सरोवर, अक्साई चीन, लोहित खोरे (नेफा) व चिनी नकाशे ह्यांबद्दल कुरबूर चाललेली होती. रशिया व इतर कम्युनिस्ट राष्ट्रांनी प्रसिद्ध केलेल्या नकाशात (१९५५ ते १९६७) अक्साई चीन, नेफा हे चीनचे प्रदेश व भूतान आणि सिक्कीम ही स्वतंत्र राष्ट्रे आहेत असे दाखविले जाई. भारत सरकार याबाबतीत मूग गिळून बसले.



# भारत-चीन सीमा

उच्च सैनिकी अधिकाऱ्यांनी भारत-चीन सीमासंरक्षणाबद्दल १९५९ च्या पूर्वी केंद्र सरकारकडे काही प्रस्ताव पाठविले होते. जनरल थिमय्या, थोरात व कलवतसिंग या सैनिकी अधिकाऱ्यांनी हिमालयाच्या संरक्षणयोजना तयार केल्या होत्या तथापि अशा काही उपाययोजना केल्यास चीनला डिवचल्यासारखे होईल, म्हणून नेहरूंनी त्या योजनांकडे दुर्लक्ष केले. कोरियात चीनने वापरलेल्या युद्धतंत्राच्या अभ्यासावरून भारतीय सेनेच्या शिक्षणासाठी जनरल प्रेमसिंग भगत यांचे चांडाल आर्मी हे पुस्तक तयार करण्यात आले होते तथापि हे पुस्तक भारतीय सैनिकी अभ्यासक्रमातून काढून टाकण्यात आले. १९५९ मध्ये चीनने भारतीय सीमाप्रदेशात पुढीलप्रमाणे घुसखोरी केली : (१) जुलै – पंगाँग, टाक्‌त्सांग गोंपा (२) ऑगस्ट – खिंझेमाने, लाँगजू (३) ऑक्टोबर – काँग्का खिंड. १९५० ते १९५९ या काळात भारताने सीमेवरील गस्ती -टेहळणी कडक केली, तसेच संरक्षणखर्चापैकी मोठा भाग रस्तेबांधणी, विमानतळ व नियंत्रण चौक्या उभ्या करण्यात खर्च करण्यात आला. चीनच्या संबंधात कडवटपणा येऊ नये म्हणून राजकीय, शासकीय व पोलिसी कार्यवाहीव्यतिरिक्त दुसरी कोणतीही विशेषतः सैनिकी कृती करण्यात आली नाही. खड्या सैन्याचा वापर सीमेवर करण्याचे टाळण्यात आले. १९६० पासून अक्साई चीन रत्त्याची बांधणी , सरहद्दीवरील घुसखोरी, भारताच्या दृष्टीने आक्षेपार्ह नकाशांचे प्रकाशन आणि तिबेटी लोकांवरील अत्याचार या चिनी कृतीमुळे 'पंचशील' तत्वांची पायमल्ली झाली. पाकिस्तानचे अध्यक्ष ⇨ अयुबखान यांचा भारत – पाकिस्तान संयुक्त संरक्षण प्रस्ताव नेहरूंनी अमान्य केला (१९५९). परत १९६० सालीही अयुबखानने तो प्रस्ताव मांडला होता. जनरल ⇨ करिअप्पांनी त्याचा पाठपुरावा केला तथापि नेहरूंनी तो स्वीकारला नाही. परिणामतः अयुबखानाचा कल चीनकडे झुकला. पुढे १९६३ साली काश्मीर -सिंक्यांगच्या सरहद्दीवरील प्रदेश पाकिस्तानने चीनला दिला.

# गार्टोक सैन्य व विमानतळ

चीनने १९५० ते १९६२ च्या मध्यापर्यंत पुढीलप्रमाणे युद्धसज्जता केली : गार्टोक सैन्य व विमानतळ : विमानाने दिल्ली केवळ ४५० किमी. अंतरावर आहे. तक्लाकोट, त्राडोम, मलिकशाह, शहिदुल्ला (सिंक्यांग) व रूडोक येथे चिनी सैनिकी तळ उभे करण्यात आले. नेफाच्या सीमेवर पुढील विमानतळ बांधण्यात आले : नारायुम त्सो, डामशुंग, टिंग्री (झिंग्री), नागेउका, शिगात्से, ग्यांगत्से, टूना या सैनिकी तळांपैकी तसेच विमानतळांपैकी काही मोठ्या तळांचीच माहिती – उदा., ग्यांगत्से वगैरेंची भारताला १९६२ सालापूर्वी होती. बाकीच्यांची माहिती युद्धानंतर झाली. कम्युनिस्ट चीनने कमीत कमी सात पायदळी डिव्हिजन भारत – चीन सीमेवर तैनात केल्याची गुप्तवार्ता जुलै /ऑगस्ट १९६२ मध्ये तैवानमधील राष्ट्रीय चीन सरकारने बँकॉकमार्गे दिल्लीला दिली होती, अशी वदंता होती. त्यांपैकी ३७, ६७ व १२४ क्रमांकांच्या डिव्हिजन युद्धपटू म्हणून प्रसिद्ध होत्या. त्यांच्याकडे डोंगरी युद्धाला उपयुक्त अशी आधुनिक शस्त्रास्त्रे होती डोंगरी युद्धतंत्र.

# चिनी सैनिकांचि घुसखोरी

परिस्थितीला गंभीर वळण मिळणाऱ्या घटना १९६२ सालच्या जुलैमध्ये गलवान खोऱ्यात व सप्टेंबरमध्ये नेफात तवांगच्या पश्चिमेला ज्या ठिकाणी तिबेट, भूतान व नेफाच्या सरहद्दी मिळतात, तेथे दोला या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणी घडल्या. ८ सप्टेंबर रोजी सु. ३०० ते १,२०० चिनी सैनिकांनी थाग खिंडीच्या दक्षिणेकडे घुसखोरी केली. २० सप्टेंबर रोजी दोलाच्या पूर्वेकडील खिंझेमानेवर त्यांनी तोफा डागण्यास सुरूवात केली. भारतीय सेनाधिकाऱ्यांनी थाग खिंड व दोला क्षेत्रांतून चिनी सैन्याला हाकलून लावण्यात आपली सेना सध्या असमर्थ असल्याचे सरकारला कळविले. एप्रिल १९६३ पर्यंत युद्धसज्जता समाधारकारक झाल्यानंतर प्रतिकार्यवाही करावी, असे नेफाच्या युद्धक्षेत्रसेनापतीने पूर्व सेनाविभाग सेनापतीला कळविले. रक्षामंत्रालयाने दोला क्षेत्रातून चिनी सैन्याला हाकलून देण्याशिवाय दुसरा उपाय नाही, असा निर्णय घेतला. परदेशातून परत आल्यानंतर रक्षामंत्री कृष्ण मेनन यांनी सरकारचे धोरण चीनवर दबाव आणण्याचे आहे, असे मत प्रगट केले. असे काही न केल्यास सरकार कोसळेल अशी भिती त्यांनी सेनाधिकाऱ्यापुढे व्यक्त केली. नेफाचे तत्कालीन सेनापती जनरल ब्रि. मो. कौल (२ ऑक्टोबर - २१ नोव्हेंबर १९६२) यांच्या म्हणण्याप्रमाणे भारताविरूद्ध चीन काही कडक कार्यवाही करील, अशी भारत सरकारची अपेक्षा नव्हती.

पहिला आक्रमक टप्पा: चीनने युद्धाच्या पहिल्या आक्रमण टप्प्यांचा आरंभ १० ऑक्टोबर १९६२ रोजी केला. थाग खिंडीच्या दक्षिणेकडील दोला क्षेत्रातील भारतीय सैन्याच्या सर्व मोर्च्यांवर भारी उखळी तोफा व मशीनगन यांचा मारा केला. युद्ध पेटणार असे वातावरण निर्माण झाले. अशा गंभीर व तंग वातावरणात १२ ऑक्टोबर रोजी सिलोनला निघण्यापूर्वी पं. नेहरूंनी मॅकमहोन रेषेच्या दक्षिणेकडील प्रदेशातून चिन्यांना हुसकावून देण्याचा आदेश सैन्याला दिल्याचे जाहीर केले. २० ऑक्टोबर रोजी पहाटे चार वाजता चिनी सैन्याने भारताच्या सातव्या ब्रिगेडवर (ब्रिगेडिअर जॉन दळवी) जबरदस्त हल्ला सुरू केला.

# तवांग व जंग यावर 'त्रिभुजा'

दोलाच्या पूर्वेकडील तवांग व जंगच्या रक्षणासाठी ब्रिगेडिअर कल्याणसिंग यांची चौथी ब्रिगेड होती. २२ ऑक्टोबर रोजी चौथ्या ब्रिगेडला तवांग-जंग सोडून मागे से या खिंडीपाशी नवी बचाव फळी खडी करण्याची आज्ञा मिळाली. त्याप्रमाणे चौथ्या ब्रिगडने माघार घेण्याचे काम सुरू केले, की नाही हे सांगता येत नाही. २२ ऑक्टोबरच्या संध्याकाळी (नेफात सु. ४ वाजता अंधार पडावयास लागतो) तवांग व जंग यावर 'त्रिभुजा ' रणतंत्राप्रमाणे चीनने आगेकूच केली. २३ ऑक्टोबर रोजी ज. कौल हे आजारी असल्याने जनरल हरबक्षसिंग यांना चौथ्या कोअरचे नेतृत्व देण्यात आले. तवांग व जंग येथील भारतीय आघाडीवर सु. २,००० – ३,००० चिनी सैनिकांनी मारा केला. चिनी सैनिकांच्या हल्ल्यांची पूर्वतयारी भारत सैन्याला दिसत असूनही त्यात भारतीय तोफखान्यांनी व्यत्यय आणला नाही. निदान रात्री जरी तोफमारा केला असता, तरी पुढे होणारे चिनी आक्रमण विस्कळीत झाले असते. कदाचित तोफांची अपुरी संख्या आणि मर्यादित पल्ला व सीमित तोफगोळे हाती असल्याने भारतीय सैन्याचा नाईलाज झाला असावा. २३ ते २४ ऑक्टोबर या दोन दिवसांत बुम खिंड, ताँगपेग खिंड, मलिकताँग खिंड व वनबाग येथे लढाया झाल्या. भारतीयांनी शक्य तो प्रतिकार केला. चीनने या लढायात भारतीयांच्या ५ ते १० पट सैन्य वापरले. त्यांनी उखळी तोफा, रणगाडा-विरोधी तोफा व मशीनगन यांचा मोठ्या प्रमणावर वापर केला. हल्ल्याच्या दिशा बदलणे, मोर्च्यांना वळसे घालून पिछाडीवर हल्ले करणे, असे चिनी रणतंत्र होते. तवांग पडल्यानंतर तवांगच्या दक्षिणेकडे से खिंडीपाशी नवीन ६२ व्या ब्रिगेडची (होशियारसिंग) आघाडी उभी करण्यात आली. २४ ऑक्टोबर १९६२ रोजी जंग ठाण्यावर चिन्यांनी भयंकर तोफमारा केला. त्यांनी बुम खिंड ते जंग हा रस्ता तयार करण्याचे काम पुरे केले. जंग ते बोमदिला हा रस्ता भारतीयांनी पूर्वीच तयार केला होता. ४ नोव्हेंबर रोजी सातव्या ब्रिगेडच्या अपयशावरून चौथ्या डिव्हिजनचे सेनापती जनरल निरंजन प्रसाद यांना काढून टाकण्यात आले.

# चीनच्या वरील तीन कलमी सूचना

चीनच्या वरील तीन कलमी सूचना जर भारताने मान्य केल्या असत्या, तर भारत चीनच्या सापळ्यात सापडला असता. रशियाचे पंतप्रधान कोसिजिन यांनी नेहरूंना चीनच्या सूचना मान्य करण्याचा सल्ला दिला. रशियाच्या प्रावदाच्या संपादकाने चीनच्या प्रस्तावाची मोठी भलावण केली (प्रावदा : २५ ऑक्टोबर १९६२), प्रस्तावाप्रमाणे समझोता केल्याने साम्राज्यवादी व वसाहतवादी यांचा मुखभंग होईल. तसेच क्यूबा व इतर समाजवादी व शांततावादी राष्ट्रांविरूद्ध अमेरिकेच्या कुटिल कटांना शह बसेल, असेप्रावदाचे मत होते. कुप्रसिद्ध मॅकमहोन रेषा चीनने कधीच मान्य केली नव्हती व ती चीन आणि भारतावर लादण्यात आली होती, अशी प्रावदाने प्रचार भूमिका घेतली. ऑक्टोबर १९६२ मध्ये क्यूबातील प्रक्षेपणाचा तळ रशियाने विस्थापित न केल्यास अमेरिकेला योग्य ती कार्यवाही करावी लागेल, अशी केनेडींनी ख्रुश्चॉव्हना धमकी दिली. ख्रुश्चॉव्हना क्यूबातील प्रक्षेपणास्त्रतळ मोडावे लागले. ही घटना भारत – चीन सीमाप्रश्नाच्या संदर्भात लक्षात ठेवावी लागते. ही संधी साधून भारतातील अमेरिकी राजदूत गालब्रेथ यांनी मॅकमहोन रेषा ही आधुनिक अर्थाप्रमाणे आंतरराष्ट्रीय सीमा असल्याचे अमेरिकेला मान्य आहे, असे जाहीर केले. क्यूबातील इतर परिस्थिती निवळल्यावर रशियाने आपला पवित्रा बदलला. गोळीबार स्थगित करून सीमाप्रश्न गोडीगुलाबीने सोडवावा, असा उपदेश कोसिजिनने दोन्ही पक्षांना केला. रशियाने आपला पूर्वीचा चीन – धार्जिणा पवित्रा बदलण्यास अमेरिकेने भारताचा केलेला पाठपुरावा हे एक कारण असावे. कदाचित भारत -चीन संघर्षाचे स्वरूप विस्तारीत होईल ही भीती असावी अथवा भारत अलिप्तावाद सोडून देईल अशाही भीती होती.

## भारत - चीन सीमाप्रदेश : युद्धोत्तर परिस्थीती, पूर्व विभाग

नेफामध्ये १५ ते २१ नोव्हेंबर या सात दिवसांत पुढीलमहत्त्वाच्या लष्करी घटना घडल्या. मागे सांगितल्याप्रमाणे भारतीय सैन्याच्या ६२ व्या ब्रिगेडने से घाटीत संरक्षण फळी खडी केली. तवांग काबीज केल्यानंतरच चिनी सैन्याने त्रिभुजात्मक हल्ल्याची पूर्वतयारी करण्यास आरंभ केला. या हल्ल्याचे अंतिम लक्ष्य कामेंगचे मुख्य ठिकाण बोमदिला होते. हल्ल्याची योजना पुढीलप्रमाणे होती : (चिनी योजनेचे स्वरूप प्रथम भारताच्या लक्षात आले नव्हते, ते २१ नोव्हेंबर नंतर लक्षात आले तथापि मागे सांगितल्याप्रमाणे १९६१ साली केलेल्या 'लाल किल्ला' प्रयोगात चिनी सैन्याच्या आक्रमणाचे संभवनीय लष्करी डावपेच मात्र भारताच्या लक्षात आले होते.) से खिंडीच्या उत्तरेकडून येथील भारतीय मोर्चेबंदीवर हल्ला करून भारतीय सैन्य लढाईत गुंतवून ठेवणे व भारतीय सैन्याची हानी करणे, हे करीत असताना से खिंडीला बगल देऊन तिच्या पश्चिम व पूर्वेकडून, तिच्या पिछाडीस, दिराँग झाँग व बोमदिलाकडे चिनी सैन्याने कूच करावयाची, तसेच येथील ६२ व्या ब्रिगेडने बोमदिलाकडे पिछेहाट करण्यास सुरूवात केल्यावर, तिच्या मार्गात अडथळे उभारून बोमदिला येथील भारतीय सैन्यापासून तिला अलग करणे व तिचा फडशा पाडणे. दिराँग झाँग येथील चौथ्या डिव्हिजनच्या कार्यालयाला धोका निर्माण केल्यावर भारतीय सैन्याची दाणादाण होण्याची अपेक्षा होती, कारण दिराँग झाँगपासून बोमदिलावर तिन्ही दिशांकडून मारा करणे चिनी सैन्याला शक्य होते. हल्ल्याच्या व हालचालीच्या वेगाने तसेच ते अखंडित ठेवल्याने भारतीय सैन्याला आसामच्या मैदानी प्रदेशापर्यंत कोठेही भक्कम ठाण मांडणे अशक्य होईल. बोमदिलाच्या दक्षिणेस म्हणजे ज्या प्रदेशावर चीन हक्क दाखवीत आहे, त्याच्या पलीकडे जाण्याचे चिनी सैन्याला कारण नव्हते. आसामच्या मैदानी प्रदेशात (ब्रह्मपुत्रेच्या उत्तरेस व हिमालयाच्या तळटेकड्या यांमध्ये) भारतीय सैन्याला तोड देणे चीनला सर्वच दृष्टीने कठीण होते. म्हणूनच भारत – चीन युद्धाला 'मर्यादित युद्ध' म्हटले जाते.

# वालाँगच्या लढाई

वालाँगच्या लढाईत भारतीय सैनिकांनी व पलटणींनी उत्तम लढवय्ये असल्याचे पटवून दिले. मात्र लढाईसाठी केलेली दलांची पखरण सदोष ठरली. लोहिताच्या दोन्हीही काठांवरील दलांची आघाडी लोहितपात्राने दुभंगली गेली. ११ वी ब्रिगेड ही आयत्यावेळी खडी केली असल्यामुळे ब्रिगेड व तिच्या पलटणीत एकात्मता निर्माण झाली नव्हती. लोहितपात्र ओलांडण्यासाठी भारतीय सैन्याकडे रबरी बोटी नव्हत्या. चिन्यांकडे होत्या. वालाँगचे रणक्षेत्र लढविण्यासाठी पुरेसे बळ नव्हते. राखीव दलांची नड भासली. राखीव सैन्य असते, तर कदाचित यश दूर नव्हते. तोफा, उखळी तोफा यांची कमतरता होती.

नेफामधील सीमाप्रश्नाशी निगडित असे उर्वरित मुलूख म्हणजे सियांग व सुबनसिरी हे उपविभाग व तिबेट यांच्यातील सरहद्द व सीमाप्रदेश हे होत. सियांग व सुबनसिरी यांच्या सीमा व सीमाप्रदेश रक्षणासाठी भारतीय गृहखात्याची आसाम रायफल जबाबदार असते. लोहित सीमाप्रांतातील किबिथू हे ठाणे चिन्यांनी काबीज केल्यावर सियांगच्या संरक्षणाची तयारी सुरू झाली. दुसऱ्या पायदल डिव्हिजनच्या १९२ क्रमांकाच्या ब्रिगेडकडे हे काम देण्यात आले. ऑक्टोबर १९६२ अखेर या ब्रिगेडच्या पलटणी सियांगमध्ये येण्यास सुरूवात झाली. १२ नोव्हेंबर १९६२ रोजी तिबेटचे चीनविरोधी खंपा बंडखोर मॅकमहोन रेषा ओलांडून सियांगमध्ये आले. त्यांचा पाठलाग करणारे चिनी सैनिक १६ नोव्हेंबर रोजी सियांगमध्ये घुसले व सरहद्दीवरील गेलिंग तसेच टुटिंग गावे त्यांनी ताब्यात घेतली आणि तेथील युद्ध थंडावले.

# सारांश

चीन आणि भारत यांच्यात दोन तुलनेने मोठ्या आणि काही छोट्या प्रदेशांवर सार्वभौमत्व लढवले गेले आहे. अक्साई चिन एकतर भारतीय केंद्र शासित प्रदेश लडाख किंवा चीनी स्वायत्त प्रदेश झिनजियांग आणि तिबेटमध्ये आहे. झिनजियांग-तिबेट महामार्गाने जोडलेली ही नापिका आणि निर्जन अशी अतीउंचावरील जगा आहे. अन्य विवादित प्रदेश मॅकमोहन लाइनच्या दक्षिणेस आहे. पूर्वी यास नॉर्थ् ईस्ट (ईशान्य) फ्रन्ट एजन्सी म्हणून संबोधले जात असे ज्याला आता अरुणाचल प्रदेश म्हणून ओळखले जाते. मॅकमोहन लाइन ब्रिटिश भारत आणि तिबेट दरम्यान १९१४ च्या सिमला अधिवेशनाचा एक भाग होता ज्यात चीनचा समवेश नव्हता करण तेव्हा तिबेट चीनने बळकावला नव्हता.

भारताने मॅकमोहन लाईनला कायदेशीर सीमा म्हणून कायम मान्य केले आहे, तर तिबेट कधीही स्वतंत्र नव्हता असे सांगून चीनने कधीही सीमा स्वीकारली नाही. १९६२ च्या सुमारास, चिनी सैन्याने मॅकमोहन लाइन ओलांडली आणि एका महिन्याच्या युद्धादरम्यान, सध्याच्या "नियंत्रण रेषे" पर्यन्त पुढे सरसावले. १९६७ मध्ये सीमा संघर्ष वाढला ज्याची परिणिती दुसऱ्या युद्धामध्ये झाली, ज्या शेवटी भारताने असे म्हटले होते की त्यांनी नवीन “वास्तविक नियंत्रण रेखा” स्थापन केली आहे. १९८७ and २०१३ मध्ये वास्तविक नियंत्रण रेषे जवळ संभाव्य संघर्ष राजनैतिक वाटाघाटीत यशस्वीरित्या निवळला.

# प्रश्नावली

१. भारत चीन संबंध १९६२ चे युध्द सीमावाद व व्यापार ?

२. भारत चीन सीमा वाद हा कशावरून झाला ?

३. चीन आणि भारतामध्ये तीन लष्करी संघर्ष झाले ?

४. आत्मनिर्भर भारत ही संकल्पना समजून घेणे ?

५. भारत चीन संबंधाला व्यापारी क्षेत्र विचार करणे ?

६. या योजनेचा प्रभाव भार चीन परराष्ट्र धोरणावर कसा पडेल याचा विचार करणे ?

७. भारत आणि चीन यांच्या मधील गलवान खो-यावर प्रश्न उभे करणे व वाद करणे ?

८. भारताता पंतप्रधानांनी १२ मे २०२० रोजी आत्मनिर्भर भारत या योजनेची सुरूवात केली ?

९. १९९० मध्ये भारताने जागतीकीकरण स्वीकारले आणि देशाची बाराजपेठ खुली केली ?

१०. भारत एक आशियाई महासत्ता असल्यामुळे चीनचे आव्हान आपल्यासाठी आर्थिक महत्वाचे आहे.

# संदर्भग्रंथ


1. आंबेकर, जी. व्ही. आणि दिवेकर, व्ही. डी. एड. दक्षिण आणि पूर्व आशियाशी चीनच्या संबंधांवरील दस्तऐवज : 1949-1962. बॉम्बे, १९६४.

2. दळवी, जे. पी. ब्रिगेडियर, हिमालयन ब्लंडर, बॉम्बे, 1969.

3. फिशर, एम, डब्ल्यू. रोज, एल.ई. आणि हटनबॅक, आर.ए. हिमालयन बॅटल ग्राउंड, लंडन, 1963.

4. भारत सरकार, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, भारत आणि चीन सरकार यांच्यातील नोट्स आणि पत्रांची देवाणघेवाण : भाग 1 – 14, नवी दिल्ली, 1954 – 1968.

5. भारत सरकार, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, सीमा प्रश्नावर भारत सरकार आणि चीनचे लोक प्रजासत्ताक यांच्या अधिकाऱ्यांचे अहवाल. नवी दिल्ली.1961.

6. भारत सरकार, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, सीमा प्रश्नावरील भारतीय अधिकाऱ्यांच्या अहवालाचा अध्याय. नवी दिल्ली.1962. 7. गव्हर्नमेंट ऑफ पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना, माओ त्से-तुंगः युद्ध आणि रणनीतीच्या समस्या, पाकिंग, 1954.

जनता शिक्षण संस्थेचे,

# किसन वीर महाविद्यालय, वाई.

## राज्यशास्त्र विभाग

## प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते आहे की,

| अ. न. | हजेरी क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|---|
| 1 | 69 | सपकाळ अपर्णा अमित |
| 2 | 88 | दुधाने सायली ज्ञानदेव |
| 3 | 100 | खरे धनश्री संतोष |
| 4 | 102 | शिंगटे नितीन राजेश |
| 5 | 110 | जाधव ऋतुजा रमेश |

यांनी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठ अभ्यासक्रमानुसार बी. ए. भाग ३ मधील राज्यशास्त्र विषयातील भारत – चीन संबंध या विषयावरील प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केला आहे.

Jadhav U.S.
मार्गदर्शक

विभागप्रमुख
Head of Dept. of Politics
Kisan Veer Mahavidyalaya
Wai - 412 803, Dist. Satara